स्थानिक स्वराज्य संस्थांच्या
सार्वत्रिक निवडणूका-२०२५
उमेदवाराने निवडणुकांमध्ये करावयाच्या
खर्चाची मर्यादा निश्चित करण्याबाबत....

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक - रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र. ४५/का-५
नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई- ४०००३२.
ई मेल - sec.corp@mah.gov.in
दिनांक : २९ ऑक्टोबर, २०२५

संदर्भ :- १. रानिआ/मनपा-२०१६/प्र.क्र.४६/का-५, दि.३१ जानेवारी, २०१७.
२. रानिआ/नप-२०१६/प्र.क्र.३७/का-६, दि.२१ ऑक्टोबर, २०१६, २४ ऑक्टोबर, २०१६ व १७ नोव्हेंबर, २०१७.
३. रानिआ/ग्रापंनि-२०१७/प्र.क्र.११/का-८, दि. २१ ऑगस्ट, २०१७.

## आ दे श

**ज्याअर्थी,** भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील पंचायती व नगरपालिका यांच्या सर्व निवडणुकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रण याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आली आहे;

**ज्याअर्थी,** स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने निवडणूक खर्चाचा हिशोब आयोगाने निर्धारित केलेल्या कालावधीमध्ये आणि विहित केलेल्या रितीने सादर करण्यात कसूर करणाऱ्या उमेदवारास अनर्ह ठरविण्याची तरतूद मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १६(१), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १०(१ई), महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम १६(१ड), महाराष्ट्र जिल्हा परिषद

आणि पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम १५-ब(१) आणि ५८(१ई) व महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम १४ ब(१) मध्ये करण्यात आली आहे.

**ज्याअर्थी**, उपरोक्त तरतुदीस अनुसरून राज्य निवडणूक आयोगाने संदर्भाधिन आदेशान्वये विविध स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरीता उमेदवाराने करावयाच्या खर्चाची मर्यादा निश्चित केली आहे.

**ज्याअर्थी**, राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ-२०२३/उनिख/ प्र.क्र.१३/ संगणकीकरण कक्ष (ब), दि. १५ फेब्रुवारी, २०२४ अन्वये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये उमेदवाराने करावयाच्या निवडणूक खर्चाची मर्यादा राज्य निवडणूक आयोगाने वेळोवेळी निश्चित केल्यानुसार राहिल असे विहित केले आहे.

**आणि ज्याअर्थी**, राज्य निवडणूक आयोगाने संदर्भाधिन आदेशान्वये सन २०१६-१७ मध्ये विहित केलेली निवडणूक खर्चाची मर्यादा निश्चित करुन सुमारे ८ वर्षाचा कालावधी झाला असून, आगामी निवडणुकांच्या अनुषंगाने सदर मर्यादा सुधारीत करणे आवश्यक झाले आहे.

**त्याअर्थी**, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए; तसेच मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १८ अ(४), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १४ (४), महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम १०-अ (४), महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम ९ अ व महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम १०-अ (४) नुसार प्राप्त अधिकारांचा वापर करून संदर्भाधिन सर्व आदेश अधिक्रमित करुन, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक / पोट निवडणुकांकरिता उमेदवाराने करावयाच्या निवडणूक खर्चाची मर्यादा पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे. :-

| अ.क्र. | स्थानिक स्वराज्य संस्था | सुधारीत खर्चाची मर्यादा (रुपये) | |
|---|---|---|---|
| | महानगरपालिका सदस्य | | |
| १ | बृहन्मुंबई | १५,००,००० | |
| २ | अ वर्ग ( पुणे व नागपूर ) | १५,००,००० | |
| ३ | ब वर्ग ( पिंपरी-चिंचवड, नाशिक व ठाणे ) | १३,००,००० | |
| ४ | क वर्ग ( कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, छत्रपती संभाजीनगर व वसई-विरार ) | ११,००,००० | |
| ५ | ड वर्ग ( उर्वरित १९ महानगरपालिका ) | ९,००,००० | |
| | नगरपरिषद / नगरपंचायत | | |
| | | थेट नगराध्यक्ष | सदस्य |
| ६ | अ वर्ग नगर परिषद (न.प.) | १५,००,००० | ५,००,००० |
| ७ | ब वर्ग (न.प.) | ११,२५,००० | ३,५०,००० |
| ८ | क वर्ग (न.प.) | ७,५०,००० | २,५०,००० |
| ९ | नगर पंचायत | ६,००,००० | २,२५,००० |
| | जिल्हा परिषद / पंचायत समिती | | |
| | जिल्हे | जिल्हा परिषद सदस्य | पंचायत समिती सदस्य |
| १० | ७१ ते ७५ निवडणूक विभाग | ९,००,००० | ६,००,००० |
| ११ | ६१ ते ७० निवडणूक विभाग | ७,५०,००० | ५,२५,००० |
| १२ | ५० ते ६० निवडणूक विभाग | ६,००,००० | ४,५०,००० |
| | ग्रामपंचायत | | |
| | सदस्य संख्या | थेट सरपंच | सदस्य |
| १३ | ७ ते ९ सदस्य | ७५,००० | ४०,००० |
| १४ | ११ ते १३ सदस्य | १,५०,००० | ५५,००० |
| १५ | १५ ते १७ सदस्य | २,६५,००० | ७५,००० |

राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ-२०२३/उनिख/प्र.क्र.१३/संगणकीकरण कक्ष (ब), दि.१५ फेब्रुवारी, २०२४ अन्वये विहित केल्यानुसार उमेदवारांनी निवडणूक खर्चाचा हिशोब वेळोवेळी सादर करणे बंधनकारक राहील.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

२०/१०/२०२५

( सुरेश काकाणी )
सचिव
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,

१. अपर मुख्य सचिव, नगर विकास विभाग (नवि-२), मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ३२

२. प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
३. सर्व विभागीय आयुक्त
४. सर्व महानगरपालिका आयुक्त
५. सर्व जिल्हाधिकारी
६. सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषद/नगरपंचायत
७. मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालयातील राज्य निवडणूक आयोगाचे वकील
८. आयोगातील सर्व कार्यासने
९. निवड नस्ती.